**महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....**

# महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,

**शासन निर्णय क्र. स्वयंअ-२०१३/(८५/१३)/माशि १**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-४०० ०३२.

**दिनांक :- १५ जून, २०१३**

**वाचा :-**

१) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक १ दिनांक ०४ जानेवारी, २०१३

२) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक ६ दिनांक १९ जानेवारी, २०१३

३) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक प्राशातु - १११२ / (२५८/२०१२) / प्राशि - ३, दिनांक १३ फेब्रुवारी, २०१३

४) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक ५ दिनांक २२ फेब्रुवारी, २०१३

५) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक ५७, ५८ व ५९ दिनांक २० एप्रिल, २०१३

६) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक नाहप्र २००९ / (६६३/०९) / माशि - १, दिनांक २० जून, २०१२

**प्रस्तावना -**

राज्यातील सर्व शाळांना **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९** लागू करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने राज्यामध्ये सर्व नवीन

खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना मान्यता देताना **हेतुपत्र** (Letter of Intent) **व शाळा मान्यता प्रमाणपत्र** (Letter Of Approval) ची पध्दती स्वीकारावी असा धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने CBSE, ICSE इत्यादी बोर्डांच्या इंग्रजी माध्यमांच्या शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी व ना हरकत प्रमाणपत्र देण्याकरीता शासन निर्णय दिनांक २० जून, २०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये विस्तृत कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.

२. कायम विना अनुदान तत्वावर नवीन खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना मान्यता देणे व विद्यमान शाळांचा दर्जावाढ करणे यासाठी शासनाने सन २०१३ मध्ये **महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२** पारित केला असून त्याची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून करण्यात आलेली आहे. या अधिनियमाच्या अनुषंगाने फेब्रुवारी, २०१३ मध्ये अर्ज मागविण्यात आले होते. प्राप्त ७,१०८ अर्जाची छाननी करुन दिनांक १५ मे, २०१३ रोजी २,४१७ अर्जांना पात्र करण्यात आलेले आहे. या पात्र प्रस्तावावर पुढील कार्यवाही कोणत्या पध्दतीने करावी ही बाब शासनाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करुन शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

**<u>शासन निर्णय -</u>**

(१) **महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२** अन्वये सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरीता प्राप्त झालेल्या एकूण ७१०८ प्रस्तावांपैकी पुढीलप्रमाणे २४१७ प्रस्ताव पात्र म्हणून जाहीर करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | वर्गीकरण | एकूण प्राप्त प्रस्ताव | पात्र प्रस्ताव | अपात्र प्रस्ताव |
|---|---|---|---|---|
| १ | नवीन शाळा मान्यतेचे प्रस्ताव | ६,१२१ | १,९७७ | ४,१४४ |
| २ | शाळा दर्जावाढीचे प्रस्ताव | ९८७ | ४४० | ५४७ |
| | एकूण | ७,१०८ | २,४१७ | ४,६९१ |

(२) **शाळा दर्जावाढीच्या** ४४० पात्र शाळांना शैक्षणिक वर्ष २०१३-१४ या वर्षापासून वर्ग सुरु करण्याबाबतची **परवानगी** देण्यात येत आहे.

(३) **नवीन शाळांचे प्रस्ताव -** वरीलप्रमाणे पात्र ठरलेल्या १९७७ नवीन शाळांना याद्वारे परवानगी देण्यात येत आहे. प्रत्येक शाळेने **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९** मधील तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे उपरोक्त संबधित पात्र ठरलेल्या शाळांच्या व्यवस्थापनांनी **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९** मधील तरतुदींची पुर्तता करुन शाळा प्रथम मान्यतेसाठी संबंधित सक्षम अधिका-यांकडे एक महिन्याच्या कालावधीत अर्ज करावेत. संबंधित सक्षम अधिका-यांनी **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९** मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(४) पूर्व प्राथमिक शाळांना स्वतंत्र शाळा म्हणून मंजूरी देण्यात आलेली नसून त्या प्राथमिक शाळेला संलग्न म्हणून मंजूर करण्यात आलेल्या आहेत त्यानुसार या अंतर्गत सुरु होणा-या शाळांना इयत्ता १ली पासून परवानगी देण्यात येईल.

(५) संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल. या अधिनियमामधील तरतुदीनुसार शाळा स्थापन करण्यास किंवा तिचा दर्जावाढ करण्याकरीता दिलेली परवानगी ही ज्या शैक्षणिक वर्षाकरीता देण्यात आलेली असेल त्या शैक्षणिक वर्षाकरीता असेल आणि अशी परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.

(६) सोबतच्या विवरणपत्रात परवानगी देण्यात आलेल्या नवीन / दर्जावाढ शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे, कार्यपध्दतीचे तसेच **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९** मधील त्याचप्रमाणे **महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम,** २०१२ यातील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

(७) सोबतच्या विवरणपत्रामध्ये दर्शविलेल्या जिल्हानिहाय तपशीलानुसार नवीन शाळा स्थापन करण्यास किंवा विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यास अपात्र ठरलेल्या प्रस्तावांच्या तपशीलासह संबंधित जिल्ह्याच्या छाननी समितीच्या सदस्य सचिवांकडून संबंधित अर्जदाराला वैयक्तिरित्या कळविणे आवश्यक राहील व त्याची पोच शासन दप्तरी ठेवण्यात यावी.

(८) सोबतच्या विवरणपत्रात परवानगी देण्यात आलेल्या नवीन / दर्जावाढ शाळांबाबत जिल्हानिहाय DISE Data मध्ये माहिती भरताना, स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद / क्रमांक घेणे आवश्यक राहील. याबातची पुढील कार्यवाही राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्यामार्फत करण्यात यावी. त्याचप्रमाणे सर्व संबंधितांच्या माहितीकरीता शाळेबाहेर स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन / दर्जावाढ प्राप्त शाळा असे जाहीर फलकावर दर्शविणे आवश्यक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in. या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. 201306151740421921 असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्रकाश ठुबे)

**सहसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
विभागातंर्गत सर्व संचालक.
मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक) जिल्हा परिषदा.
सर्व शिक्षण निरीक्षक (पश्चिम / उत्तर / दक्षिण) बृहन्मुंबई.
मा. मंत्री, (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.
मा. राज्यमंत्री, (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.
मा.अपर मुख्य सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक
सर्व सहसचिव / उपसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग.
निवडनस्ती माशि - १.

| अनु. क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थाचे नाव | प्रस्तावित शाळेचे नाव व पत्ता | माध्यम | नवीन शाळा / दर्जा वाढ | छाननी समितीची शिफारस व त्या बाबत प्राप्त झालेल्या हरकती / सूचना / आक्षेप विचारात घेता शासनाचा अंतिम निर्णय | शाळेचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| ७२५ | पुणे | कै. उषाताई लोखंडे चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे, वैदुवाडी, पुणे-१६ | कै. उषाताई लोखंडे चॅरिटेबल ट्रस्ट संचलित माध्यमिक विद्यालय, सांगिसे, ता.मावळ | मराठी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ७२६ | पुणे | श्री दत्तकृपा शैक्ष. व कृषी ग्राम विकास प्रतिष्ठाण घारगाव ता. श्रीगोंदा जि. अहमदनगर | श्री. आनंदराव जगताप इंग्लिश मेडियम स्कुल, मांडवगण फराटा ता. शिरुर जि.पुणे | मराठी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ७२७ | पुणे | मावळ शिक्षण प्रतिष्ठान, तळेगांव दाभाडे, ता.मावळ | श्री पद्मावती विद्यामंदीर, उर्से, ता.मावळ, जि.पुणे | मराठी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ७२८ | पुणे | नवयुग शिक्षण संस्था, दौंड, ता.दौंड | स्व.सुभाष बाबुराव कुल उच्च प्राथमिक शाळा, काळेवाडी (चौफुला), ता.दौंड | मराठी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ७२९ | पुणे | म्हसोबा शिक्षण प्रसारक मंडळ निमगाव महाळुंगी ता. शिरुर जि.पुणे. | गुरुवर्य शंकरराव भुजबळ इंग्लिश मेडियम स्कुल शिरुर ता. शिरुर जि.पुणे | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ७३० | पुणे | चैतन्य चॅरिटेबल फौंडेशन, इंदोरी, ता.मावळ, जि.पुणे | चैतन्य प्रबोधिनी इंग्लिश स्कूल, इंदोरी, ता.मावळ | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ७३१ | पुणे | मातोश्री शिक्षण संस्था, जरेवाडी, पो.गुळाणी, ता.खेड | एस.एन.इंग्लिश मिडीयम स्कूल, राक्षेवाडी, ता.खेड | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ७३२ | पुणे | कारभारी आण्णा चारि.फाऊंडेशन बारामती जि.पुणे. | कारभारी आण्णा चारि.फाऊंडेशन प्रायमरी स्कुल बारामती ता. बारामती जि.पुणे. | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ७३३ | पुणे | श्री रामचंद्र एज्युकेशन सोसायटी, लोणीकंद, ता.हवेली | न्यू टाईम्स इंटरनॅशनल स्कूल, लोणीकंद, ता.हवेली | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ७३४ | पुणे | मावळ विद्या प्रतिष्ठान, भागरवाडी, लोणावळा | दादा देशमुख मेमोरियल स्कूल, औंढे खुर्द, ता.मावळ | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ७३५ | पुणे | समर्थ ज्ञानपिठ ,सोमेश्वर ता. बारामती जि.पुणे | सह्याद्री पब्लिक स्कुल खंडोबाची वाढी ता. बारामती जि.पुणे.(आय.सी.एस.ई.) | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ७३६ | पुणे | जोग एज्युकेशनल ट्रस्ट, शिवाजीनगर, पुणे-४ | जे.ई.टी.एस. स्कूल, मयुर कॉलनी, कोथरुड, पुणे | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ७३७ | पुणे | गुरुकुल शैक्षणिक संस्था, धायरी, पुणे-४१ | गुरुकुल शैक्षणिक संस्था, धायरीगांव, पुणे-४१ | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ७३८ | पुणे | भारती विद्यापीठ | भारती विद्यापिठइंग्लिश मेडियम स्कुल (सी.बी.एस.ई.) लवळे ता. मुळशी जि.पुणे. | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ७३९ | पुणे | अलार्ड चॅरिटेबल ट्रस्ट, अलंकार सिनेमा बिल्डिंग, पुणे-१ | अलार्ड पब्लिक स्कूल, स.नं.५०, मारुंजी, ता.मुळशी, जि.पुणे | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी सन २०१३-२०१४ व २०१४-२०१५ या शैक्षणिक वर्षाकरिता मान्यता दिलेल्या प्रस्तांवामध्ये दुरुस्तीबाबत...

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन शुध्दीपत्र क्रमांकः एसएफएस-१०१५/प्र.क्र.१३३/एसएम-२
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक :- ७ नोव्हेंबर, २०१५

वाचा :-

१)शासन निर्णय क्रमांक :स्वयंअ-२०१३/(८५/१३)/माशि-१,दिनांक १५/०६/२०१३.
२)शासन निर्णय क्रमांक: स्वयंअ-२०१३/(८५/१३)/माशि-१,दिनांक ०५/१०/२०१३.
३)शासन निर्णय क्रमांक:एसएफएस-१११४/प्र.क्र.४०/एसएम-२,दिनांक २६/०२/२०१४
४)शासन निर्णय क्रमांक :स्वयंअ-२०१४/प्र.क्र.२०८/एसएम-२,दिनांक २५/०६/२०१४.

प्रस्तावना

१.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा यथास्थिती,उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळेस दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याकरिता तरतुदी करणे,तसेच अशी नवीन शाळा स्थापन करण्यासह,विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणे,त्याकरिता अर्ज मागविणे,व विहित पध्दतीने परवानगी देणे,यासाठी महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ ( सन २०१३ चा ०१) मध्ये तरतुदी विहित करण्यात आल्या आहेत.

१.२ स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर खाजगी नवीन शाळांना शैक्षणिक वर्ष २०१३-१४ व शैक्षणिक वर्ष २०१४-१५ करिता नविन शाळा मान्यता देणे, विद्यमान शाळांना दर्जावाढ करणे या करिता दिनांक ३१ जुलै,२०१२ व दिनांक ३१ जुलै,२०१३ पर्यत अर्ज मागविण्यात आले होते.सदर प्रस्तांवाची छाननी करुन सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षाकरिता पात्र ठरणा-या ३२४५ व २२१७ शाळांना शैक्षणिक वर्ष सन २०१३-१४ व २०१४-१५ पासून,नवीन शाळा स्थापन करणे आणि विद्यमान शाळांना दर्जावाढ करणे याकरीता संदर्भाधीन दिनांक ०५/१०/१३, दि.१५/०६/२०१३, दि.२६/०२/२०१४, दि.२५/०६/२०१३ च्या शासन निर्णयान्वये परवानगी देण्यात आली आहे.संस्थांनी केलेली विनंती आणि आदेशामध्ये दुरुस्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन शुध्दीपत्र :-**

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१३-१४ व २०१४-१५ या शैक्षणिक वर्षाकरिता शाळांना परवानगी दिलेल्या संदर्भाधीन दिनांक ०५/१०/१३, दि.१५/०६/२०१३, दि.२६/०२/२०१४,दि.२५/०६/२०१३ मधील सर्व अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील या अटींच्या अधीन राहून सोबतच्या विवरणपत्र- अ व विवरणपत्र-ब नुसार शाळांच्या आदेशामध्ये दुरुस्ती/सुधारणा करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२.२ सदर आदेश व्यवस्थापन/संस्था यांना १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित शिक्षण उपसंचालक यांची राहील.

२.३ सदर शासन शुध्दीपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असुन त्याचा संकेतांक २०१५१११७११३६००७१२१ असा आहे.हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramchandra Ganpat Gunjal

Digitally signed by Ramchandra Ganpat Gunjal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=dc74b0493b4979ad0aa76763f873c23fa35ecb44970562d4aa14a832b6357e54, cn=Ramchandra Ganpat Gunjal
Date: 2015.12.11 12:21:54 +05'30'

(रा.ग.गुंजाळ)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१.आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,नागपूर/कोल्हापूर/पुणे
३.विभागीय शिक्षण उपसंचालक,नागपूर विभाग नागपूर./कोल्हापूर/पुणे/अमरावती/मुंबई.
४.राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
५.शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
६.शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
७.शिक्षणाधिकारी,(प्राथमिक/माध्यमिक),जिल्हा परिषद,नागपूर/कोल्हापूर/पुणे/अमरावती.
८.निवडनस्ती (एसएम-२).

विवरणपत्र-अ

शाळेचे माध्यम दुरुस्ती प्रस्ताव

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियमन २०१२ अंतर्गत परवानगी दिलेल्या प्रस्तावामध्ये दुरुस्ती बाबत..

१) शासन निर्णय क्र.स्वयंअ २०१३/(८५/१३)/(ii)/माशि-१, दिनांक ५ ऑक्टोंबर,२०१३

२) शासन निर्णय क्र.एसएफएस-१११४/प्र.क्र.४०/एसएम-२,दिनांक २६/२/२०१४

| अ.क्र. | शासन निर्णय मधील अनुक्रमांक | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | शाळेचे नाव व ठिकाण | यापूर्वी परवानगी दिलेल्या शासन निर्णयाचा दिनांक | प्रकार | नवीन शाळा/ दर्जावाढ | माध्यम | क्षेत्रिय अधिका-यांनी दुरुस्तीबाबत दिलेले अभिप्राय | शासनाने दुरुस्ती केल्यानंतर दयावयाची अंतिम मान्यता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | ६०५ | नागपूर | विदर्भ बहुउद्देशिय शिक्षण संस्था बेलोना ता.नरखेड जि.नागपूर | स्व.वसंतराव देशमुख माध्यमिक विद्यालय खैरगाव,ता.नरखेड,जि नागपूर | ५.१०.२०१३ | उच्च माध्यमिक | दर्जावाढ | इंग्रजी | असा बदल करण्याबाबत विभागीय उपसंचालक नागपूर यांनी शिफारस केली आहे. | कला इंग्रजी ऐवजी विज्ञान इंग्रजी |
| २ | २११२ | रत्नागिरी | दि हर्णे एज्युकेशन ॲंड वेलफेअर सोसायटी,हर्णे ता.दापोली जिल्हा रत्नागिरी | ज्यु कॉलेज आर्टस ॲंड कॉमर्स हर्णे ता.दापोली जिल्हा रत्नागिरी | २६.२.२०१४ | उच्च माध्यमिक कला विज्ञान वाणिज्य | नवीन | इंग्रजी | असा बदल करण्याबाबत शिक्षण उपसंचालक कोल्हापूर यांनी शिफारस केली आहे. | स्वयंअर्थसहाय्यित शाळा कला शाखेसाठी (इंग्रजी ऐवजी उर्दु) |
| ३ | १०५७ | ठाणे | वाडा निमिर्ती एज्युकेशन सोसायटी,वाणी आळी,वाडा | के.डी.गंधे ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्टस,सायन्स ॲण्ड कॉमन्स हरोसाळे,ता. वाडा जि.ठाणे | २६.२.२०१४ | उच्च माध्यमिक कला विज्ञान वाणिज्य | नवीन | इंग्रजी | असा बदल करण्याबाबत शिक्षण उपसंचालक, मुंबई यांनी शिफारस केली आहे. | इंग्रजी ऐवजी मराठी (कला शाखा) |

## विवरणपत्र-ब

### शाळेचे प्रकार दुरुस्ती

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन ) अधिनियमन २०१२ अंतर्गत परवानगी दिलेल्या प्रस्तावामध्ये दुरुस्ती बाबत

१) शासन निर्णय क्र.स्वयंअ-२०१३/८५/१३/माशि-१,दिनांक १५.६.२०१३

२) शासन निर्णय क्र.एसएफएस-१११४/प्र.क्र.४०/एसएम-२,दिनांक २६.२.२०१४

३) शासन निर्णय क्र.एसएफएस-१०१४/प्र.क्र.२०८/एसएम-२,दिनांक २५/६/२०१४

| अ.क्र | शासन निर्णया मधील अनुक्रमांक | जिल्हा | संस्थेचे नांव व पत्ता | शाळेचे नांव व ठिकाण | यापूर्वी परवानगी दिलेल्या शासन निर्णयाचा दिनांक | प्रकार | नवीन शाळा/ दर्जावाढ | माध्यम | क्षेत्रिय अधिका-यांनी दुरुस्तीबाबत दिलेले अभिप्राय | शासनाने दुरुस्ती केल्यानंतर दयावयाची अंतिम मान्यता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | ७३५ | पुणे | समर्थ ज्ञानपिठ सोमेश्वर ता.बारामती जिल्हा पुणे | संचलित सहयाद्री पब्लिक स्कुल, खंडोबाची वाडी ता.बारामती जिल्हा पुणे | १५.६.२०१३ | प्राथमिक | नवीन | इंग्रजी | असा बदल करण्याबाबत विभागीय उपसंचालक पुणे यांनी शिफारस केली आहे. | प्राथमिक ते उच्च माध्यमिक |
| २ | १३३९ | पुणे | मुक्ताई ज्ञानकला क्रिडा शै.प्रतिष्ठाण शेळगांव ता.इंदापूर जि.पुणे | महात्मा जोतिबा फूल विद्यालय शेळगांव ता.इंदापूर जि.पुणे | २६.२.२०१४ | माध्यमिक | नवीन | मराठी | असा बदल करण्याबाबत शिक्षणाधिकारी (माध्यमिक) पुणे यांनी शिफारस केली आहे. | माध्यमिक ऐवजी प्राथमिक ते उच्च प्राथमिक |
| ३ | १४२ | बुलढाणा | डॉ.बाबासाहेब आंबेडकर बहु.क्रिडा व समाजसेवा संस्था,शिवणीजाट, बुलडाणा | छत्रपती शाहु महाराज इंग्लिश स्कुल शिवणीजाट, ता.लोणार, जि.बुलडाणा | २५.६.२०१४ | उच्च प्राथमिक | नवीन | इंग्रजी | असा बदल करण्यासाठी शिक्षण उपसंचालक अमरावती यांनी शिफारस केली आहे. | उच्च प्राथमिक ऐवजी प्राथमिक |

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**

**No.NOC-4017/C.R.No.127/SM-3**
School Education and Sports Deptt.
Madam Cama Road,Hutatma
Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai- 400 032.
Date:-**23rd** June, 2017.

**To,**

**The Secretary,**
Central Board of Secondary Education,
Siksha Kendra 2, Community Centre,
Preet Vihar, Vikas Marg,
**New Delhi 110301.**

**Sub:-** No Objection Certificate for affiliation of **Central Board of Secondary Education**
**" Sahyadri Public School, Khandobachi Vadi, Tal.Baramati, Dist. Pune " run by " Samarth Dnyanpith, Someshwar, Tal.Baramati, Dist.Pune "**

**Ref:-** 1) Government Resolution, School Education & Sports Department, No. NOC. 2009/ (663/09)/SE-1, Dated 20/6/2012.
2) Government Resolution,School Education and Sports Department, No.SFS-1016/C.R.No.176/SM-2, Dated-21.10.2016
3) Letter dated 17.05.2017 from President, " Samarth Dnyanpith, Someshwar, Tal.Baramati, Dist.Pune "

Sir,

I am directed to forward herewith the application along with enclosures in original received for " Sahyadri Public School, Khandobachi Vadi, Tal.Baramati, Dist.Pune " run by " Samarth Dnyanpith, Someshwar, Tal.Baramati, Dist.Pune " and to state that the State Government has No Objection for C.B.S.E. affiliation to the school for **Std.I to Std.X** subject to fulfillment of different conditions laid down in the Government Resolution, School Education and Sports Department, No. NOC. 2009/(663/09)/SE-1, dated 20/6/2012 as well as following conditions:-

1. Like all other schools in the State, Section 18 & 19 of the Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009 and its Schedule as well as Rules, Orders, Notifications and Circulars etc. issued by the State Government from time to time under this Act shall be applicable to the said school.
2. Institution shall abide by the provision of Section 12(1)(C) of RTE Act, 2009 and Maharashtra RTE Rules 2011.
3. RTE Act, 2009 provides for Inclusive Education thus children with special needs (CWSN) called " Divyang " shall be part of every class in the school. However, " Divyang" children need special policy pronouncements. The State of Maharashtra is framing and issuing various policies in this respect. Goverment recently issued Resolution No. Mise 2015 / (119-A)/ SD-6 Dated 8th January,2016 in this reguard, this Government Resolution is abiding. All directives, decisions and policies shall be abided by all schools of all boards including international boards.
4. State's all Educational Acts, Rules, Orders and Policies made time to time shall be applicable to the said school.
5. Curriculum of the State Board or respective Board shall be compulsory for I to VIII Standard.

Scanned by CamScanner

6. Marathi language subject shall be taught from I to VIII standard.
7. Staff salaries shall not be paid lesser than the Schedule 'C' of Maharashtra Employees of Private Schools (Conditions of Service) Regulation Act, 1981.
8. The management shall follow the traffic and safety guidelines indicated by the Police, Fire Services and Transport Department from time to time. The instructions issued by Circular No. 21748/DI/97 dated 16/2/1998 and No. PRE-2008/506/11/Prashi-1 dated 14/7/2011 & other orders of transport department for safe transportation of school children should be scrupulously followed. The management shall provide fire protection arrangement as prescribed in the National Building Code of India, Part-IV Fire 1997 and there are amendments made from time to time.
9. The school shall conduct 3 tests annually for all children upto Standard VIII and provide information about children achievements in SARAL database as per the provisions of Pragat shaikshanik Maharashtra Government Resolution dated 22nd june 2015.
10. Childwise information as sought in SARAL and every other information as sought in U-DISE shall be provided by the school from time to time as demanded by the State Authorities.
11. Institution shall abide by the policy and Maharashtra Educational Institutions (Regulation of Fees) Act, 2011 made by the State Government regarding Regulation of fees.
12. Indian History especially "History related to Maharashtra" shall be taught in the school. Failing which this No Objection Certificate shall be withdrawn.
13. The Complaint Redressal Committee regarding sexual harassment at school premises should be formed as per government resolution, woman and child department No. मकचौ-२०१३/ प्र.क्र.६३ /मकक, Dated 19.6.2014 and subsequent provisions in Act and Rules
14. The State Government reserves the rights to withdraw the above certificate at any time without giving prior notice and without assigning any reason if any deviation of rules reported in future and the management falls to comply with the instructions of the State Government.

2. You are requested to forward a copy of the affiliation when granted to the above school for office record.

**Yours faithfully,**

S.M.Nanal

**( S.M.Nanal )**
**Deputy Secretary to the Government of Maharashtra.**

**Encl: As above.**

**Copy to -**

1) The Principal Secretary, School Education & Sports Department, Mantralaya, Mumbai.
2) The Commissioner ( Education ), Maharashtra State, Pune.
3) The Director (Primary/Secondary & Higher Secondary) Maharashtra State, Pune.
4) The Deputy Director of Education, Pune.
5) Education Officer (Primary/Secondary), Zilla Parishad, Pune.
6) Private Secretary to the Hon'ble Minister (School Education)
7) The Headmaster, President, " Samarth Dnyanpith, Someshwarnagar, Tal.Baramati, Dist.Pune "
8) Select File (SM - 3)

Scanned by CamScanner